# भूमिसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ च्या कलम क्र. ३३(१) अंतर्गत आदेश

ज्याअर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (ज्यास यापुढे उक्त अधिनियम असे संबोधण्यात आले आहे)च्या कलम क्र. ३३(१) अन्वये जिल्हाधिकारी हे निवाडा पारित झाल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी, आदेशाद्वारे, त्यातील कारकुनी अथवा अंकगणितीय चुकांची दुरुस्ती करण्यास सक्षम आहेत; तसेच

ज्याअर्थी उक्त अधिनियमाचे कलम क्र. ३ (जी) मध्ये जिल्हाधिकारी या संज्ञेत समुचित शासनाने अधिसूचित केलेल्या अधिकाऱ्यांचादेखील समावेश असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे; तसेच

ज्याअर्थी भूमिसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ मधील नियम क्र. २(१)(छ) अन्वये जिल्हाधिकारी याचा अर्थ उपजिल्हाधिकारी (भूमिसंपादन) हा देखील असल्याचे अधिसूचित करण्यात आले आहे; आणि

ज्याअर्थी भूसंपादन प्रकरण क्र. १/४७/२०१२-१३, मौजे – धामणगाव, तालुका – अकोट, जिल्हा – अकोला च्या दि. १३/०२/२०१५ रोजी पारित केलेल्या निवाड्यात काही कारकुनी चुका झाल्याचे निदर्शनास येऊन ह्या चुका दुरुस्त करण्याची निकड निर्माण झाली आहे अशी माझी खात्री पटली आहे;

त्याअर्थी मी, शरद पाटील, उपजिल्हाधिकारी (भूमिसंपादन), काटेपूर्णा मोर्णा प्रकल्प, अकोला, पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:

**आदेश**

क्र. कक्ष ८/अका/काटेपूर्णा/कावि-२८०/२०१५,
उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, काटेपूर्णा
मोर्णा प्रकल्प यांचे कार्यालय
दिनांक: २०/०३/२०१५

1. भूसंपादन प्रकरण क्र. १/४७/२०१२-१३, मौजे – धामणगाव, तालुका – अकोट, जिल्हा – अकोला च्या दि. १३/०२/२०१५ रोजी पारित केलेल्या निवाड्यात पृष्ठ क्र. ५ वरील परिच्छेद (ब) मधील पहिल्या ओळीतील जुन्या भूसंपादन कायद्याचे कलम ४ ची अधिसूचना अंतिमरीत्या दिनांक २०/११/२०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली याऐवजी जुन्या भूसंपादन कायद्याचे कलम ४ ची अधिसूचना अंतिमरीत्या दिनांक २४/१०/२०१३ रोजी प्रसिद्ध करण्यात आली अशी दुरुस्ती करण्यात यावी.

2. उक्त भूसंपादन प्रकरणातील श्री. महादेव शामराव अकोटकर यांच्या मालकीचा गट क्र. ८९ व श्री. संजय प्रकाश अकोटकर यांच्या मालकीचा गट क्र. ९० या जमिनी जिरायती नसून बारमाही बागायती असल्यामुळे त्यांना जिरायत जमिनीच्या दराच्या दुप्पट म्हणजे रु. १०,३४,०००/- प्रति हेक्टरी दर देण्यात यावा. तशी दुरुस्ती निवाड्यातील प्रपत्र 'ई' मध्ये करण्यात यावी.
3. उपरोक्त सर्व दुरुस्त्या करून सुधारित निवाडा सर्व संबंधितांना कळविण्यात यावा. त्याचप्रमाणे तो जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला यांच्या संकेतस्थळावर प्रसृत करण्यात यावा.

स्वा/-

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
काटेपूर्णा मोर्णा प्रकल्प, अकोला